दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३२० ■ गुरूवार, दि. २० मार्च २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -320 ■ Thursday, 20 March 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## ऑनलाईन-गेमिंगच्या १०९७ साईटस बंद, अश्विनी वैष्णव यांची माहिती

नवी दिल्ली : ऑनलाईन गेमिंगच्या समस्येबाबत केंद्र सरकार अतिशय गंभीर आहे. आतापर्यंत १०९७ ऑनलाईन गेमिंग साईटस बंद करण्यात आल्याची माहिती केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बुधवारी लोकसभेत दिली. प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान एका प्रश्नाला उत्तर देताना वैष्णव म्हणाले की, राज्य सरकारांशी समन्वय साधून ऑनलाइन गेमिंग आणि सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी सतत प्रयत्न केले जात आहेत. संवैधानिक तरतुदींनुसार, आम्ही या समस्येतून मुक्त होण्यासाठी राज्य सरकारांसोबत जलदगतीने काम करू. केंद्र सरकार राज्य सरकारांच्या सहकार्याने यावर काम करत आहे. त्यांनी सांगितले की नियामक संस्था या प्रकरणात चांगले काम करू शकते. ऑनलाइन गेमिंगच्या तावडीतून लोकांना, विशेषतः मुलांना वाचवण्याच्या प्रयत्नात, १०९७ ऑनलाइन गेमिंग साइट्स बंद करण्यात आल्या आहेत. ऑनलाइन गेमिंग आणि सायबर गुन्ह्यांच्या दुष्परिणामांबद्दल लोक जागरूक होत आहेत. सरकारच्या प्रयत्नांमुळे समाजात सायबर गुन्ह्यांबाबत जागरूकता वाढत असल्याचे वैष्णव यांनी सांगितले.

## गैरव्यवहार करणाऱ्या सहकारी सोसायटींवर कारवाई करणार

मुंबई : कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार करणाऱ्या सहकारी सोसायटींवर कारवाई करण्यात येईल अशी माहिती राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत दिली. सदस्य सदाशिव खोत यांनी अर्धातासाच्या चर्चेदरम्यान उपस्थित केलेल्या सांगली जिल्ह्यातील सहकारी सोसायटीच्या गैरव्यवहाराच्या प्रश्नावर उत्तर देताना राज्यमंत्री भोयर बोलत होते. सांगली विविध कार्यकारी सहकारी सोसायटीने दिलेल्या खावटी कर्ज प्रकरणाची योग्य चौकशी केली जाईल असे सांगून राज्यमंत्री भोयर म्हणाले की, एक हजार पेक्षा जास्तीचे कर्ज चेकने वितरीत करावयाचे असून ते रोखीने देता येत नाही. तसेच ५० हजार रुपयांपेक्षा जास्तीचे कर्ज वाटप करता येत नाही.अशा प्रकारे कर्ज वाटप करून त्याच्या वसुलीसाठी एखाद्या शेतकऱ्याच्या जमिनीचा लिलाव करण्यात येत असेल तर अशा प्रकरणांमध्ये चौकशी करण्यात येईल. तसेच अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या शेतीचा लिलाव करता येणार नाही किंवा जप्तही करता येणार नाही. चौकशी झाल्यानंतरच सबंधित शेतकऱ्यांच्या जमिनीबाबत निर्णय घेतला जाईल असेही राज्यमंत्री भोयर यांनी सभागृहात सांगितले.

## दिशा सालियन मृत्यू प्रकरणी नव्याने चौकशी करण्यात यावी

मुंबई : दिशा सालियन मृत्यू प्रकरणी नव्यानं चौकशी करण्यात यावी अशी मागणी करत वडील सतीश सालियन यांची हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. दिशावर सामूहिक बलात्कार करून तिची निर्घृण हत्या केल्याचा आरोप तिच्या वडिलांनी केली आहे. तसेच या प्रकरणात एनआयए चौकशीची मागणीही त्यांनी केली आहे. या प्रकरणी आता लवकरच सुनावणी अपेक्षित आहे. या प्रकरणाचा तपास समीर वानखेडेंसारख्या प्रामाणिक अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली करण्याची मागणी दिशाचे वडील सतीश सालियन यांनी याचिकेच्या माध्यमातून केली आहे. मुंबई पोलिस आणि माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी दिशाभूल करत आपल्यावर दबाव टाकल्याचा दावा दिशाच्या वडिलांचा केला आहे. त्यांनी आपल्याला नजरकैदेत ठेवत मांडलेले पुरावे खरे मानण्यास भाग पाडल्याचा गंभीर आरोपही या याचिकेतून करण्यात आला आहे.

# शहरांच्या झपाट्याने होणाऱ्या विस्तारामुळे घटली चिमण्यांची संख्या

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

एकेकाळी घराघरांत सहज दिसणाऱ्या चिमण्या आता दुर्मिळ होत चालल्या आहेत. पूर्वी चिमण्यांच्या गोष्टी सांगत लहान मुलांना जेवण भरवले जायचे, पण आज वास्तव वेगळे आहे. मुंबई-ठाणे सारख्या शहरांमध्ये वाढते शहरीकरण, मोबाईल टॉवरमधून निघणारे किरण, वाढता ध्वनी आणि हवेचे प्रदूषण यांमुळे चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत असल्याचे सांगितले जाते. २० वर्षांपूर्वी कावळे, घारी, कबुतरांसोबतच चिमण्याही मोठ्या संख्येने दिसायच्या. मात्र, शहरांच्या झपाट्याने होणाऱ्या विस्तारामुळे त्यांची संख्या घटली आहे. चिमण्यांच्या संख्येत वाढ झाली की घट, याबाबत ठोस वैज्ञानिक अभ्यास नाही. त्यामुळे या विषयावर संशोधन होणे गरजेचे आहे, असे पक्षी अभ्यासकांचे मत आहे.

**चिमण्यांचे रक्षण – आपल्या हातात!–**

चिमण्यांची संख्या वाढवण्यासाठी आपण घराच्या खिडक्यांवर आणि अंगणात दाणे व पाणी ठेवू शकतो. तसेच झाडे लावून आणि कृत्रिम घरटी बसवून चिमण्यांना सुरक्षित अधिवास निर्माण करून देणे आवश्यक आहे. चिमण्यांचा चिवचिवाट पुन्हा ऐकण्यासाठी आता सर्वांनी एकत्र यायला हवे!

शहरांमध्ये चिमण्यांची संख्या टिकवण्यासाठी अनेक संस्था आणि पक्षीमित्र प्रयत्नशील आहेत. झाडांचा आधार घेऊन लाकडी कृत्रिम घरटी बसवली जात आहेत.

या घरट्यांजवळ चिमण्यांसाठी धान्य आणि पिण्याचे पाणी ठेवले जात आहे. काही नागरिकांनी घराच्या खिडकीवर पाणी आणि दाणे ठेवण्यासाठी खास व्यवस्था केली आहे.

भारतामध्ये आढळणारे चिमण्यांचे प्रकार- मुंबई ठाण्यात हाऊस स्पॅरो ही चिमणी सर्वांना सुपरिचित आहे.

चिमणीच्या कपाळाचा, शेपटीवरचा आणि पार्श्वभाग राखाडी, कानाजवळ पांढरा, चोच काळी, छातीच्या भाग काळा , डोक्यापासून खाली पोटाचा भाग पांढरा पाठीवर तपकिरी काळ्या तुटक रेषा या सोबतच संजयगांधी राष्ट्रीय उद्यानातील जंगलात चेस्टनट शोल्डर पेट्रोनिया ही चिमणी आढळून येते. ही चिमणी साधारण हाऊस स्परो सारखीच असून तिच्या मानेखाली पिवळ्या रंग असतो.भारतात रसेट स्पॅरो, युरेशियन ट्री स्पॅरो, सिंध स्पॅरो, स्पॅनिश स्पॅरो असे सात ते आठ प्रकारच्या चिमण्या आढळतात, अशी माहिती पक्षी अभ्यासक हिमांशू टेंभेकर यांनी दिली.

**चिमण्यांचे आवडते ठिकाण –**

चिमण्यांच्या संख्येबाबत मतभेद असले तरी काही भागांत चिमण्यांचे थवे नक्कीच पाहायला मिळतात. मुंबई-ठाणे परिसरातील मलबार हिल, हिंदू कॉलनी, धारावी नेचर पार्क, विक्रोळी पार्क साईट, आरे कॉलनी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, पारसिक डोंगर आणि ठाणे खाडी किनारा येथे चिमण्यांची चिवचिव ऐकू येते. नागरी वस्त्यांमध्ये सकाळी आणि संध्याकाळी चिमण्यांचा किलबिलाट सहज ऐकायला येतो.

# डिजिटल अटक, सायबर फसवणूक प्रकरणी उच्च न्यायालयाचे पोलिसांवर ताशेरे

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

एका वृद्ध शिक्षिकेने केलेल्या डिजिटल अटकेच्या तक्रारीवर तत्परतेने कारवाई न केल्याबद्दल उच्च न्यायालयाने बुधवारी मुंबई पोलिसांना फटकारले. तसेच, डिजिटल अटक आणि सायबर फसवणुकीच्या तक्रारी गांभिर्याने घेत नसल्याबाबत नाराजी व्यक्त करताना या तक्रारींवर योग्य व तत्परतेने कारवाई करण्याचे न्यायालयाने पोलिसांना बजावले.



डिजिटल आणि सायबर फसवणूकीच्या प्रकरणांमध्ये फसवणूक होणाऱ्यांचे अधिक आर्थिक नुकसान टाळता यावे यासाठी या प्रकरणांचा वेळेत तपास करणे खूप महत्त्वाचे आहे. अशा प्रकरणांत तत्परतेने कारवाई करणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे, असेही न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. एका ७२ वर्षांच्या महिलेने दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणीच्या वेळी न्यायालयाने मुंबई पोलिसांकडून कारवाईत होणाऱ्या ढिसाळपणावर ताशेरे ओढले.

सामान्य नागरिकाने न्याय मागण्यासाठी प्रत्येकवेळी न्यायालयातच यायला हवे का? याचिकाकर्तीची आर्थिक स्थिती चांगली असल्याने तिने न्यायालयात धाव घेतली, पण अशा प्रकारे फसवणूक झालेल्या अन्य नागरिकांचे काय? पोलिसांना नागरिकांना मदत करावीच लागेल, ते त्यांचे कर्तव्य आहे. - उच्च न्यायालय, मुंबई

पोलिस ठाण्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे आवश्यक

फसवणुकींना ज्येष्ठ नागरिक दररोज बळी पडतात, त्यामुळे असे गुन्हे कसे हाताळावे याबद्दल सर्व पोलिस ठाण्यांना काही मार्गदर्शक तत्त्वे आखून देणे आवश्यक असल्याचेही न्यायालयाने म्हटले.

सर्वसामान्य अशा फसवणुकीला बळी पडणार नाहीत यासाठी जागरूकता निर्माण करण्याचेही न्यायालयाने म्हटले.

अशा तक्रारी पोलिसांतर्फे हलक्यात घेतल्या जाणार नाही यासाठी शिवाजी नगर पोलिस ठाण्यातील दोषी अधिकाऱ्यांवरही कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने म्हटले.

# पीएम किसान सम्मान निधी योजनेत १८१ बोगस बांगलादेशी लाभार्थी

**नाशिक (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

नाशिकमध्ये एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. प्रधानमंत्री किसान सम्मान निधी योजनेअंतर्गत १८१ बोगस लाभार्थींची नावे आढळून आली असून, हे लाभार्थी बांगलादेशी असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भाजप नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांनी कृषी अधिकारी कार्यालय आणि पोलीस ठाण्यास भेट देत तातडीने चौकशीची मागणी केली आहे.

किरीट सोमय्या यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, या प्रकरणाची सखोल चौकशी होईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही, बांगलादेशी घुसखोरीचा आणि सरकारी योजनांचा गैरवापर रोखणे अत्यावश्यक आहे.

ग्रामस्थांची सतर्कता आणि आठवडाभराच्या चौकशीत हा प्रकार उघडकीस आला. या १८१ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरित करण्यात आला. मात्र, याबाबत शंका निर्माण झाल्यानंतर पुढील हप्ते तत्काळ रोखण्यात आले. तहसीलदारांनी या प्रकरणी तक्रार दाखल करण्याचे मान्य केले असून, पोलिसांनीही गुन्हा दाखल करण्याची तयारी दर्शवली आहे.

सुरुवातीच्या तपासात या लाभार्थ्यांची बँक खाती बांगलादेशच्या सीमेलगत असलेल्या गावांशी संबंधित असल्याचे आढळून आले आहे.

हे प्रकरण केवळ एकाच योजनेपुरते मर्यादित आहे की अन्य योजनांच्या बाबतीतही असे घडले आहे, याचा सखोल तपास सुरू आहे. गरज पडल्यास केंद्र सरकार, रिझर्व्ह बँक आणि सायबर सेलची मदत घेतली जाणार आहे.

भादवण गावातील जागरूक ग्रामस्थांनी हा प्रकार लक्षात आणून दिला. यामुळे हा घोटाळा वेळीच उघड झाला. मालेगाव जन्म दाखला घोटाळ्यासारखाच हा प्रकार मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराची शक्यता दर्शवतो. पोलीस आणि प्रशासन या संपूर्ण प्रकरणाचा तपास करून सत्य बाहेर काढण्यासाठी सज्ज झाले आहेत.

या प्रकरणी पुढील तपास सुरू असून, अजूनही काही बोगस लाभार्थ्यांची नावे यादीत असण्याची शक्यता आहे. प्रशासनाच्या दक्षतेमुळे पुढील आर्थिक नुकसान टळले असले, तरी हे संपूर्ण रॅकेट शोधण्यासाठी अधिक गहन तपासाची गरज आहे.

# उष्णतेच्या लाटांवर दीर्घकालीन उपाययोजनांचा अभाव!

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भारतातील शहरी लोकसंख्येपैकी ११ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या मुंबई, सुरत, बंगळुरू, दिल्ली, फरीदाबाद, ग्वाल्हेर, कोटा, लुधियाना आणि मेरठ या शहरांमध्ये आहे. ही प्रमुख शहरे उष्णतेच्या वाढत्या धोक्याला सामोरे जाण्यासाठी कशाप्रकारे तयारी करीत आहेत, याचा अभ्यास करून एक अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यातील माहिती फारशी सकारात्मक नाही.

'सस्टेनेबल फ्युचर्स कोलॅबोरेटिव्ह'ने (एसएफसी) केलेल्या पाहणीमध्ये असे आढळले आहे की, देशातील नऊ प्रमुख शहरांमध्ये उष्णतेच्या लाटांवर तात्काळ उपाययोजना करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येतात. पण, या संदर्भात दीर्घकालीन उपाययोजना करण्याचे प्रमाण कमी आहे. तर, काही शहरांमध्ये दीर्घकालीन उपाययोजना केल्या जातात. मात्र, त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे केली जात नाही असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. या समस्येवर प्रभावी दीर्घकालीन नियोजन न केल्यास भविष्यात वारंवार येणाऱ्या तीव्र आणि दीर्घ कालावधीच्या उष्णतेच्या लाटांमुळे भारतात उष्णतेमुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे असा इशारा अहवालात देण्यात आला आहे.



# रोग निदान तपासण्यांसाठी राज्यात स्वतंत्र कायदा

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्यात रोग निदान तपासण्यांसाठी अर्थात पॅथॉलॉजी लॅबसाठी स्वतंत्र कायदा आणण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी विधानपरिषदेमध्ये दिली. अर्ध्यातासाच्या चर्चेदरम्यान सदस्य सुनिल शिंदे यांनी राज्यातील रोग निदान तपासणीचे दर आणि प्रयोगशाळांतील सुविधांबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आरोग्य मंत्री अबिटकर बोलत होते. राज्यातील रोगनिदान तपासण्यांचे दर शासनाने कोविड काळात व त्यापूर्वीही ठरवून दिले असल्याचे सांगून आरोग्य मंत्री अबिटकर म्हणाले की, त्यासाठी शासन निर्णय निर्मगित करण्यात आला असून या शासन निर्णयानुसारच तपासणीचे दर आकारले जात आहेत. तरीही रोगनिदान तपासण्या करणाऱ्या प्रयोगशाळांवर नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने एक स्वतंत्र कायदा आणण्याचे शासनाचे नियोजन आहे. त्यामध्ये या प्रयोगशाळांची गुणवत्ता, त्यामधील साधन सामुग्री, यंत्रणा आणि मनुष्यबळ यांचे नियमन केले जाणार आहे. लवकरच हा कायदा अस्तित्वात येऊन त्याची अंमलबजावणी सुरू होईल. तसेच अवैध पद्धतीने कोणी अशा तपासण्या करत असतील तर त्यांच्यावर कारवाई करणे आता शक्य होणार असल्याची माहितीही अबिटकर यांनी दिली.

# नागपूर दंगल प्रकरणी १२५० हून अधिक संशयितांवर गुन्हे दाखल

नागपूर : नागपूरच्या महाल परिसरात सोमवारी झालेल्या हिंसाचार प्रकरणी पोलिसांनी १२५० हून अधिक संशयितांवर गुन्हे दाखल केले आहेत. सोशल मिडीया पोस्ट आणि सीसीटीव्ही फुटेजचा आधार घेऊन पोलिस पोलिसांनी ६ गुन्हे नोंदवले आहेत. नागपुरातील कोतवाली, गणेशपेठ आणि तहसील पोलिस ठाण्यात हे गुन्हे दाखल केले असून आतापर्यंत २०० जणांची ओळख पटवून ६० आरोपींना अटक करण्यात आली आहे.

विश्व हिंदू परिषद आणि बजरंगदलाच्या कार्यकर्त्यांनी औरंगजेबाची कबर हटविण्याची मागणी करीत औरंगजेबाच्या प्रतिकात्मक कबरीवर हिरव्या रंगाची चादर टाकून जाळली. त्यामुळे समाज माध्यमांवर विविध अफवा पसरल्या व सायंकाळी दंगल पेटली. भालदारपुरा, हंसापुरीत अनेक वाहनांची जाळपोळ केली. सोबतच शंभरावर वाहनांची तोडफफोड करीत पोलिसांवरदेखील दगडफफेक केली. त्यात ३५ हून अधिक अधिकारी आणि कर्मचारी जखमी झाले. अतिरिक्त कुमक मागवत भालदारपुरा, चिटणीस पार्क येथील परिस्थिती पोलिसांनी नियंत्रणात आणली. कोम्बिंग ऑपरेशन राबवत पोलिसांनी ५० हून अधिक समाजकंटकांना ताब्यात घेतले. या प्रकरणात तीन पोलीस ठाण्यांत एकूण ६ गुन्हे दाखल झाले आहेत. दंगलग्रस्त परिसरातील जवळपास १०० सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यामध्ये दिसणाऱ्या संशयितांची माहिती पोलिसांनी गोळा केली. सीसीटीव्ही फुटेजमधील अनेकांना पोलिसांनी ताब्यात घेणे सुरु केले असून त्यामध्ये अल्पवयीन मुलांचाही समावेश आहे.

# अमेरिकेच्या नाकावर टिच्चून

अमेरिकेच्या मध्यस्थीने दोन वर्षांपासून सुरु असलेले इस्रायल-हमास युध्द थांबवण्यात आले होते. परंतु, सोमवारी रात्री इस्रायलने पुन्हा एकदा गाझा पट्टीवर मोठा हवाई हल्ला केला. मध्यस्थी धुडकावून लावत अमेरिकेच्या नाकावर टिच्चून हा हल्ला करण्यात आल्याने दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष झालेल्या डोनाल्ड ट्रम्प यांची चांगलीच नाचक्की झालेली आहे. युक्रेन युध्द थांबवण्यासाठी ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यात चर्चा होणार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर लगेचच इस्रायलचा हा हल्ला झाल्यामुळे ट्रम्प यांच्या मध्यस्थी करण्याच्या प्रयत्नातदेखील अडथळा निर्माण होऊ शकतो. रशिया आणि युक्रेनचे युध्द थांबवण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत, असे ट्रम्प यांनी फ्लोरिडा येथून वॉशिंग्टनला जाताना स्पष्ट केले होते. इस्रायलने केलेल्या या नवीन हल्ल्यात किमान दोनशे लोक मारले गेले आहेत. हजिकच युध्द काळामध्ये गाझापट्टी सोडून गेलेल्या आणि युध्दबंदीनंतर आनंदात परत आलेल्या लोकांमध्ये खळबळ उडाली आहे. काहीही झाले तरी आपली सैन्याची कारवाई सुरुच राहाणार असल्याचे इस्रायलने जाहीर केले आहे. त्यामुळे आता अमेरिकेने केलेल्या युध्दबंदीवरच सवाल पस्थित होत आहे. हमासने या हल्ल्यानंतर इस्रायलने केलेला युध्दबंदीचा करार मोडल्याचा आरोप केला आहे. पॅलेस्टिनी नागरिकांसाठी सुरु करण्यात आलेल्या एका शाळेतील निवारा केंद्रावरदेखील इस्रायलने

रॉकेटने हल्ला केला आहे. गेल्या दोन आठवड्यांपासून इस्रायलने अन्न, औषधे, इंधन आणि इतर वस्तूंचा पुरवठा रोखला असल्याचे हमासने म्हटले आहे. इस्रायल आणि हमासमध्ये युध्दबंदी झाल्यानंतर दोन्ही बाजूंकडून करार मोडल्याचा आरोप वारंवार झालेला आहे. गाझापट्टीवर हल्ला करण्यापूर्वी इस्रायलने अमेरिकेची संमती घेतली होती. अमेरिकेच्या प्रेस सेक्रेटरी करोलीन लेवीट यांनी सांगितले की, ट्रम्प यांनी यापूर्वीच हमास, हुतीज, इराण आणि इतर सर्व दहशतवाद्यांना त्यांनी केलेल्या कर्माची फळे भोगावीच लागतील, अशी घोषणा आकाशवाणीच्या मुलाखतीत केली होती. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामीन नेतान्याहू यांनी युध्दबंदीचा कालावधी चालू असताना चर्चा पूर्णपणे थांबल्यामुळे हे हल्ले करण्यात आल्याचा दावा केलेला आहे. सतरा महिन्यांपासून चालू असलेले युध्द पूर्णपणे थांबवण्यासाठी दबाव म्हणून इस्रायलने हे हल्ले केले असण्याची शक्यता आहे. पॅलेस्टिनी अधिकाऱ्यांनी सांगितले की, इस्रायलच्या हल्ल्यात ६९ पॅलेस्टिनी मारले गेले आहेत.

संपूर्ण जग तिसऱ्या महायुध्दाच्या खाईत लोटले जाणार का, या आशंकेने जगभरातील देश सध्या चिंतेत पडले आहेत. तिसरे महायुध्द सुरु झाले तर त्याच्या झळा युरोपासह भारतासारख्या विकसनशील देशांनादेखील सोसाव्या लागणार आहेत. पुतीन आणि ट्रम्प यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध असणारे मोदी या साऱ्या घडामोडीत कशा पध्दतीने भूमिका बजावणार, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

# ‘सुरक्षित व समृद्ध महाराष्ट्र निर्माण करणार’ - मुख्यमंत्री

मुंबई : महाराष्ट्र एक स्थैर्य असलेले राज्य आहे. तसेच प्रगतशील राज्य असून शांतता आणि सौहार्दतेसाठी ओळखले जाणारे आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेला कुणीही गालबोट लावल्यास शासन कठोर कारवाई करेल. राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवत ‘ सुरक्षित व समृद्ध महाराष्ट्र’ करण्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत अर्थसंकल्पातील गृह विभागावरील मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना दिली.

महाराष्ट्रातील शांतता कुणीही भंग करू नये. जर कुणी भंग करण्याचा प्रयत्न केला, तर त्याला सोडण्यात येणार नाही. नागपुरातील घटनेत पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांना कठोरात कठोर शासन करण्यात येईल, असा इशारही यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिला.

सन २०२५ - २६ अर्थसंकल्पातील गृह विभागाच्या ३६ हजार ६१४ कोटी ६८ लाख ९ हजार रुपये रकमेच्या मागण्या सभागृहात मंजूर करण्यात आल्या आहेत.

उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले, राज्यात घटना घडत असतात. मात्र घटना घडल्यानंतर गुन्हेगाराला शिक्षा होणे महत्त्वाचे आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीवर कारवाई करीत गुन्हे सिद्धतेचे प्रमाण वाढवण्यासाठी शासन कार्य करित आहे. सर्व गुन्हेगारी प्रकारांमध्ये राज्य देशात आठव्या क्रमांकावर आहे. शहरांमध्ये होणाऱ्या गुन्हेगारीत देशात पहिल्या पाच क्रम ांकात राज्यातील एकही शहर नाही. देशाच्या तुलनेत शहरी भागातील गुन्हेगारी राज्यात तुलनेने कमी आहे. एकूण गुन्हेगारी मध्ये २०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये २ हजार ५८६ गुन्ह्यांनी घट झाली आहे.

महिलांवरील अत्याचार

२०१३ पासून महिलांवरील विनयभंगाच्या गुन्ह्याची व्याख्या बदलली आहे. विनयभंगाचा गुन्हा आता बलात्काराचा गुन्हा समजण्यात येतो. निर्भया घटनेनंतर कायद्यात बदल करण्यात आला आहे. महिलांवरील तक्रारींना ‘ फ्री रजिस्ट्रेशन ऑफ कंप्लेंट ‘ करण्यात आले आहे. त्यामुळे महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. मागील काळात महिला आपल्यावरील अत्याचाराची नोंद करण्यासाठी पुढे येत नव्हत्या. मात्र समाजमन बदलत आहे. महिला त्यांच्यावर होत असलेले अत्याचाराविषयी बोलू लागल्या आहेत. स्वतःहून पुढे तक्रारी नोंद करीत आहेत. बलात्काराच्या गुन्ह्यांमध्ये आरोपींचे वर्गीकरण करण्यात आले आहे. ओळखीच्या व्यक्तीकडून बलात्काराचे घटना २०२४ मध्ये ९९.८ टक्के घडून आल्याचे दिसते. तर अनोळखी व्यक्तींकडून बलात्काराच्या घटना २०२४मध्ये ९९.४८ टक्के गुन्हे घडल्याचे निदर्शनास येते. महिलांवरील अत्याचारा प्रकरणी ६० दिवसात आरोपपत्र दाखल करण्याचा राज्याचा दर ९० टक्के आहे. हा दर १०० टक्के करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. भारतीय न्याय संहितेच्या नवीन कायद्यानुसार अशा घटनांमध्ये गुन्हे सिद्धता वाढवण्याची व्यवस्था उभी करण्यात आली आहे. बलात्काराच्या गुन्ह्यांमध्ये २०२४ मध्ये ६० दिवसात निर्गती करण्याचे प्रमाण ९४ टक्के होते, २०२५ मध्ये हे प्रमाण ९९ टक्क्यांपर्यंत जाण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

महिला अत्याचार नियंत्रणासाठी उपाय योजना

उत्तर माहिती देताना मुख्यमंत्री म्हणाले, महिलांवरील अत्याचाराच्या घटना नियंत्रणात आणण्यासाठी उपयोजना करण्यात येत आहे. पोलीस घटक स्तरावर महिला सहाय्यक कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. हा कक्ष महिलांसाठी समर्पित आहे. या ठिकाणी महिलांची तक्रार महिला अधिकाऱ्यांकडूनच नोंदवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. महिला व पोस्को कायद्यांतर्गत दाखल गुन्हे निकाली काढण्यासाठी न्यायालय कार्यरत होणार आहेत. दामिनी पथक, निर्भया कक्ष आणि भरोसा सेल सुरू करण्यात आला आहे. शाळा महाविद्यालयांमध्ये पोलीस अधिकारी जाऊन महिला सुरक्षा विषयी जनजागृती करीत आहे. निर्भया फंडातील २५० कोटीचा निधी प्राप्त झाला असून त्यापैकी २३६ कोटीचा निधी खर्च करण्यात आला आहे.

ध्डायल ११२

डायल ११२ मध्ये मदत मागितल्यास तातडीने महिलांना मदत देण्यात येत आहे. या क्रमांकाचा प्रतिसाद वेळ देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या क्रमांकावर जाण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. हा क्रमांक सीसीटीएनएस प्रणालीद्वारे केंद्र सरकारच्या यंत्रणांशी संलग्नित आहे. अनैतिक मानवी वाहतूक रोखण्यासाठी समन्वय कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. तसेच महिलांवरील अत्याचाराला प्रतिबंध करण्यासाठी विशाखा समितीही स्थापन करण्यात आली आहे.

ऑपरेशन मुस्कान

लहान मुलांच्या शोधासाठी राज्यामध्ये ऑपरेशन मुस्कान उपक्रम राबविण्यात येत आहे. अशा पद्धतीने १२ उपक्रम पूर्ण करण्यात आले आहे. या उपक्रमाला देश पातळीवर गौरविण्यात आले आहे. राज्यामध्ये ३८ हजार ९१० लहान मुलांचा या ऑपरेशनच्या माध्यमातून शोध घेऊन त्यांच्या पालकांपर्यंत त्यांना पोहोचविण्यात आले आहे. पोस्को कायद्यांतर्गत विशेष कृती दल स्थापन करण्यात आले आहे. तसेच १०९८ टोल फ्री क्रमांक वरून मदतही देण्यात येत आहे.

दोषसिद्धीचा दर

राज्यात गुन्ह्यांमधील दोषसिद्धीचा दर वाढवण्यासाठी शासन विविध पातळ्यांवर प्रयत्न करीत आहे. सन २०१५ पासून राज्याचा दोषसिद्धीचा दर दरवर्षी वाढत आहे. २०१५ मध्ये तो ३३ टक्के होता, तर २०२४ मध्ये हा दर ५० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. पुढच्या काळात किमान ७५ टक्के पर्यंत दोषसिद्धीचा दर नेण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे.

न्याय वैद्यक प्रयोगशाळा

भारतीय न्याय संहितेच्या नवीन कायद्यानुसार ‘फॉरेन्सिक नेटवर्क ‘ प्रबळ करण्यात येत आहे. न्याय सहाय्यक वैद्यक उत्कृष्ठता केंद्र स्थापन करण्यात आले आहे. मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन सुरू करण्यात आल्या आहेत. या माध्यमातून तांत्रिक पुरावे घेण्यात येत आहे. हे पुरावे ब्लॉकचेन पद्धतीने जमा करण्यात येत आहे. त्यामुळे कुठेही पुरावा नष्ट होण्याची वेळ येणार नाही. तसेच गुन्हा घडलेल्या ठिकाणी चित्रीकरण करण्यात येत आहे. यासाठी पोलिसांना पुढील काळात टॅब देण्यात येणार आहे. यामुळे गुन्हे तपासणी करण्याची प्रक्रिया पारदर्शक होत आहे.

सायबर क्राईमवर नियंत्रण आणणार

राज्यात सायबर गुन्हेगारी कमी करण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. यासाठी ५१ प्रयोगशाळा तयार करण्यात आलेल्या आहेत. महासायबर नावाचे मुख्यालय नवी मुंबई उभारण्यात आले आहे. देशपातळीवर या क्षेत्रातील सर्वात आधुनिक यंत्रणा राज्यात निर्माण करण्यात आली आहे. सायबर केंद्राचे महामंडळात रूपांतर करण्यात येत आहे. महासायबर मुख्यालयाला तीन राज्यांच्या शिष्टमंडळाने भेट दिली आहे. तसेच दोन देशांनी पण अशा पद्धतीचे काम त्यांच्या देशामध्ये करण्याची रुची दाखविली आहे. महामंडळ तयार करून या क्षेत्रातील काम व्यावसायिक स्वरूपात करण्याचा पण विचार शासन करीत आहे. सायबर ऑडिट करण्याची क्षमता यंत्रणा विकसित करण्यामुळे निर्माण झाली आहे. सायबर गुन्हा घडल्यानंतर २४ तासात या गुन्ह्याची उकल करण्याची क्षमता निर्माण करण्यात येत आहे. राज्याच्या सायबर प्लॅटफॉर्मवर सर्व बँक, सोशल मिडिया संलग्न करण्यात येत आहे. गोल्डन अवरमध्ये गुन्हा सिद्ध करून फसवणूक केलेली रक्कम परत देण्याचे कार्यवाही करण्यात येणार आहे. २०२४ मध्ये सायबर क्राईमच्या फसवणुकीचे ४४० कोटी रुपये थांबवण्यात आले येवून हे पैसे परत करण्यात आलेले आहे. सायबर क्राईमची तक्रार दाखल करण्यासाठी केंद्र शासनाने १०४५ टोल फ्री क्रमांक जारी केला आहे.

ऑपरेशन ब्लॅक फेस

लहान मुलांचे अश्लील व्हिडिओ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर असल्याचे निदर्शनास येत आहे. याबाबतीत बऱ्याच तक्रारी समोर आले आहेत. अशा प्रकारचे लहान मुलांचे अश्लील व्हिडिओ फोटो व साहित्य विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शोधून ते काढून टाकण्यासाठी ऑपरेशन ब्लॅक फेस सुरू करण्यात आलेले आहे.

अमली पदार्थ विरोधी कक्ष

प्रत्येक पोलीस स्टेशनला अमली पदार्थ विरोधी सेल सुरू करण्यात आलेला आहे. या माध्यमातून अमली पदार्थांची विक्री, वाहतूक आणि साठवणुकीवर कारवाई करण्यात येत आहे. अमली पदार्थ विषयी गुन्ह्यांमध्ये पोलिस आढळून आल्यास संबंधित पोलिसाला बडतर्फ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. बंद रासायनिक कंपन्यांना नियमित भेट देण्यात येत आहे. यासाठी एम आयडीसीलाही सूचित करण्यात आले आहे. कोडीम घटक आधारित सिरप अमली पदार्थ म्हणून वापरण्यात येते. हे सिरप मेडिकल दुकानदारांनी प्रिस्क्रिप्शन शिवाय न देण्याचे बंधन टाकण्यात आले आहे तसेच त्याचे रेकॉर्डही ठेवायला सांगितले आहे. यामुळे या सिरपची आयात कमी झाल्याचे दिसून येते. गुप्त माहितीच्या आधारे सिंथेटिक ड्रग’ वरती पण कारवाई करण्यात येत आहे.

नागपुरात न्यायवैद्यक विज्ञान विद्यापीठ

गुन्हे सिद्ध करण्यामध्ये न्याय वैद्यक प्रयोगशाळांचे महत्त्व लक्षात घेता केंद्र शासनाने देशात तीन ठिकाणी न्याय वैद्यक विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यापैकी एक विद्यापीठ राज्यात नागपुरात करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. लवकरच नागपूर शहरात हे विद्यापीठ आकारास येणार आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोगावर आधारित मार्वल यंत्रणा गुन्हे सिद्ध करण्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा मोठ्या प्रमाणात उपयोग करण्यात येणार आहे. यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित मार्वल यंत्रणा निर्माण करण्यात आलेली आहे. या यंत्रणेची मदत कायदा व सुव्यवस्थेचे संबंधित विभाग घेत आहे . ‘डेटा मायनिंग’ साठी या कंपनीची मदत होत आहे.

सीसीटीव्ही यंत्रणा बळकट करणार

द्धसीसीटीव्ही यंत्रणा राज्यात बळकट करण्यात येत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सीसीटीव्ही यंत्रणा निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे. वाहतूक व्यवस्थापनाम ध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सीसीटीव्हीचा उपयोग करण्यात येत आहे. यासाठी गुगल कंपनीसोबत ‘ सेंटर ऑफ एक्सलन्सी इन एआय ‘ करार करण्यात आला आहे.

रिक्त जागा भरणार

पोलीस विभागात १० हजार ५०० रिक्त जागा आहेत. तसेच दरवर्षी ७ ते ८ हजार जागा रिक्त होत असतात. मागील तीन वर्षात राज्यांमध्ये विक्रमी ३५ हजार ८०२ पदांची भरती करण्यात आलेली आहे. सध्या असलेल्या रिक्त पदांची भरतीपण लवकरच करण्यात येईल. पोलीस उपनिरीक्षक पदाच्या रिक्त जागा भरण्यात आलेल्या आहेत.

# कामाच्या ठिकाणी महिलांचे शोषण : बदलती प्रवृत्ती आणि स्त्री-अधिकार

**महिला** दिन साजरा झाला असला तरी पण कार्यस्थळी महिलांचे वास्तव अजूनही धूसर आहे. स्त्रियांना उच्चपद मिळवण्यासाठी आपल्या नैतिक मूल्यमापनाशी तडजोडी कराव्या लागत आहेत, हे विदारक सत्य आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांना आपल्या आत्मसन्मानासाठी लढावे लागत आहे.

नुकताच जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा करण्यात आला. या दिवशी स्त्री-शक्तीचा जयजयकार होतो, पण कार्यस्थळी महिलांचे वास्तव अजूनही धूसर आहे. अनेक क्षेत्रांमध्ये महिलांना संधी दिली जाते, मात्र त्यांच्या कष्टांची किंमत त्यांच्या शारीरिक व भावनिक शोषणाच्या स्वरूपात ठरवली जाते.

कामाच्या ठिकाणी शोषणाची विविध रूपे ही वेगवेगळी आहेत. त्यामुळे या गंभीर समस्येवर महिला धोरणामध्ये उपाय शोधण्याची खूप गरज आहे.

महिला सक्षम होत असताना, काही अधिकारी त्यांचा गैरफायदा घेतात. महिला केवळ त्यांच्या कार्यक्षमतेसाठी नव्हे, तर इतर कारणांसाठी वापरल्या जातात. काही अधिकारी एकाच वेळी अनेक महिलांशी अनैतिक संबंध ठेवतात. महिलांच्या भावनांशी खेळून, त्यांच्या स्वप्नांची दिशा बदलून, त्यांना अशा कचाट्यात अडकवले जाते की, त्या हे सर्व ‘प्रगतीसाठी’ स्वीकारायला तयार होतात.

कामाच्या ठिकाणी स्त्री-पुरुष समानता असली तरी, काही पुरुष अधिकाऱ्यांचे वर्तन अजूनही स्त्रियांकडे केवळ आकर्षणाच्या दृष्टीने पाहणारे आहे. स्त्रियांना बढती, सोयीसुविधा किंवा उच्च पद मिळवण्यासाठी आपल्या नैतिक मूल्यमापनाशी तडजोडी कराव्या लागत आहेत, हे विदारक वास्तव आहे.

सततच्या सुरू असणाऱ्या व स्त्रियांवर बिंबवल्या जाणाऱ्या या पुरुषी वर्चस्वामुळे स्त्रियांची मानसिकता यास बळी पडत आहे आणि त्यामुळे त्यांचा या शोषणाकडे बघण्याचा दृष्टिकोन व प्रवृत्ती बदलत आहे.

पूर्वी महिलांना अशा शोषणाचा सामना करताना मोठी लाज आणि भीती वाटायची. मात्र, आज काही महिला याला इन्सेंटिव्ह म्हणून पाहतात. आपली स्वप्ने, करिअर, आर्थिक स्थैर्य यासाठी काहीजणी स्वतःहून अशा सापळ्यात अडकतात. ही मानसिकता समाजासाठी घातक आहे.

स्त्रियांच्या मूलभूत अधिकारांची गळचेपी होत असताना, त्यांचा वापर केवळ एक वस्तू म्हणून केला जातो, हे लक्षात घ्यायला हवे. त्यांच्या नकारामुळे त्यांचे नोकरीतील पुढील भवितव्य धोक्यात आणले जाते. त्यांना त्यांचे पुढील करिअर कुठेच करता येणार नाही यासाठी सर्वतोपरी या न त्या प्रकारे अडचणी आणल्या जातात. अशा स्त्रिया भविष्यात कुठेही नोकरी करू शकणार नाहीत याची त्या अधिकाऱ्यांकडून पूर्णपणे बंदोबस्त केला जातो. स्त्रीचे स्वतःच्या पायावर उभे राहणे हे इतके कठीण का होत आहे? पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांना आपल्या आत्मसन्मानासाठी लढावे लागत आहे. पण सर्वच पुरुष वाईट असतात असे नाही. काही पुरुष सहकारी, अधिकारी आणि व्यवस्थापक खरोखर स्त्रियांना आदराने वागणूक देतात. मात्र, काही पुरुष अधिकाऱ्यांच्या अशा गैरवर्तनामुळे संपूर्ण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे राहत आहे.

महिला शोषण रोखण्यासाठी योग्य महिला धोरणांची गरज आहे. त्यासाठी खालील उपाययोजना प्रभावी ठरू शकतात.

सशक्त कायदे आणि कठोर अंमलबजावणी - महिला शोषणविरोधी कायद्यांची कडक अंमलबजावणी केली पाहिजे. लैंगिक शोषणविरोधी कायदा (झडकक अली) प्रभावीपणे लागू केला जावा.महिला तक्रार निवारण समित्या - प्रत्येक कंपनीत आणि सरकारी कार्यालयांमध्ये तक्रार निवारण समित्या कार्यरत असाव्यात आणि त्यांचा कार्यभाग पारदर्शक असावा. बढतीसाठी निकष पारदर्शक करणे - बढतीसाठी कौशल्य, अनुभव, कार्यक्षमता आणि गुणवत्ता यांनाच म हत्त्व द्यावे. महिलांमध्ये जागरूकता आणि शिक्षण - महिलांनी कोणत्याही तडजोडीशिवाय आपल्या कर्तृत्वावर पुढे जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

पुरुष सहकाऱ्यांसाठी संवेदनशीलता प्रशिक्षण - पुरुष सहकाऱ्यांनी महिलांना आदराने वागवावे यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबवले पाहिजेत. कामाच्या ठिकाणी सुरक्षेची खात्री - सीसीटीव्ही, हेल्पलाईन नंबर आणि तक्रार व्यवस्थापन यंत्रणा प्रभावी करावी. स्त्रिया केवळ शरीराने नव्हे, तर मनाने, बुद्धीने आणि कर्तृत्वाने मोठ्या आहेत. त्यांना पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करण्याचा अधिकार आहे. कार्यालये, कंपन्या, उद्योग क्षेत्र आणि सरकारी यंत्रणा यांनी याची जाणीव ठेवून स्त्रियांना योग्य तो सन्मान दिला पाहिजे. लालसेपोटी वाहत जाणाऱ्या आणि नैतिकतेशी तडजोड करणाऱ्या स्त्रियांचे समुपदेशन करून त्यांना योग्य समज द्यावा.

स्त्रियांना हक्क मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे, हीच मोठी शोकांतिका आहे; परंतु या परिस्थितीत बदल घडवण्यासाठी, महिलांनी स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवून कोणत्याही परिस्थितीत आपल्या आत्मसन्मानाशी तडजोड न करता प्रगती साधली पाहिजे.

महिलांवरील अन्याय, शोषण आणि तडजोडींच्या मानसिकतेला कायमचे संपवण्याचा निर्धार सर्वांनी करू या! -के. जे. सोमैया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सायन, मुंबई

– डॉ. वैशाली वाढे

# यूपीएससी प्रमाणेच एमपीएससी मध्ये डिस्क्रिप्टीव परीक्षा होणार

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

लवकरच एमपीएससीच्या माध्यमातून मोठी भरती निघणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत सांगितले. भरतीसाठी एमपीएससीत नवे बदल केले जात असल्याचेही ते म्हणाले. एमपीएससी परीक्षा पास झाल्यानंतर काही विद्यार्थ्यांना नियुक्ती मिळत नाही, या मुद्द्यावरही फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. तसेच यूपीएससी परीक्षेचा अभ्यास करणारे विद्यार्थी एमपीएससीचा देखील अभ्यास करुन परीक्षा देऊ शकतात यासाठी डिस्क्रिप्टीव परीक्षेचा निर्णय घेण्यात आल्याची घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली.

एमपीएससी केलेल्यांची भरती सुरू आहे. फक्त १४ जणांची भरती कागदपत्रांच्या त्रुटीमुळे रखडली आहे. कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर ही भरती प्रक्रिया पूर्ण केली जाईल. यूपीएससी प्रम णेच एमपीएससी वेळापत्रक आधीच जाहीर करते. पण आरक्षणावरुन न्यायालयात सुरू असलेल्या खटल्यामुळे २०१८ – १९ पासून सातत्याने एमपीएससीच्या वेळापत्रकात बदल करावा लागत आहे. वेगवेगळ्या आरक्षणाच्या प्रश्नांमुळे न्यायालयाचे निर्णय येतात, कधी एसीबीसीचा निर्णय येतो, कधी इडब्यूएसचा विषय येतो, कधी इडब्यूएसम धून एसबीसीचा विषय येतो, मग त्यात वेगवेगळ्या न्यायालयातून ज्या स्थगिती येतात त्यामुळे हा जास्त वेळ लागतो. पण पुढच्या काळात आपला प्रयत्न असेल की यूपीएससी प्रमाणे एमपीएससीसाठीही योग्य प्रकारचे वेळापत्रक तयार करावे; असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत सांगितले.

महाराष्ट्रात २०२३ मध्ये डिस्क्रिप्टीव एमपीएससी आणली होती. पण सर्व विद्यार्थ्यांनी विनंती केली म्हणून २०२५ पासून डिस्क्रिप्टीव परीक्षा सुरू करण्याचा निर्णय झाला आहे. एमपीएससीने तो निर्णय घेतला आहे. एमपीएससी या वर्षापासून डिस्क्रिप्टीव परीक्षाच घेणार आहे. बहुतांश विद्यार्थ्यांचं त्यांना समर्थन आहे. काही विद्यार्थ्यांचा विरोध देखील आहे. तो विरोध आपण या ठिकाणी ग्राह्य धरणार नाही. कारण आपल्या विद्यार्थ्यांचं त्यामुळे यूपीएससीत नुकसान होतं. यूपीएससीत डिस्क्रिप्टीव आहे. एमपीएससी डिस्क्रप्टीव राहिली नाही तर आपले विद्यार्थी एकाचवेळी एमपीएससी आणि यूपीएससी अशी दोन्ही प्रकारची तयारी करू शकणार नाही; असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यूपीएससी प्रमाणेच एमपीएससी डिस्क्रिप्टीव केल्याचे सांगितले. एमपीएससीत पेपर सेंटीग स्वत: एमपीएससी करते. आपण काही इन्फ्रास्ट्रक्चर बाहेरचं घेतो. बाकी सगळं एमपीएससीच्या माध्यमातून होतं. आपल्याला माहिती आहे, एमपीएससीने सुदैवाने गेल्या काही वर्षांमध्ये पारदर्शी पद्धतीने परीक्षा घेण्याचा उपक्रम चालवलेला आहे. कुठलाही गोंधळ झालेला नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

एमपीएससीत ज्या तीन जागा रिक्त आहेत त्यातील एक भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. इतर दोन जागांसाठी जाहिरात देणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. पुढच्या काळात आपल्याला मोठ्या प्रमाणात भरती प्रक्रिया राबवायची आहे. ती वेळेत झाली पाहिजे याकरता आपल्या जेएडी सेवा, सचिवांना जबाबदारी दिली आहे. त्यांनी सर्व राज्यांचा आणि यूपीएससीचा अभ्यास केलेला आहे. आपण रिस्ट्रक्चरिंगचं प्रपोजल तयार करत आहोत. वर्ग एक, वर्ग दोन यासोबतच वर्ग तीनही आपण एमपीएससीला दिलेले आहेत. एमपीएससीचं रिस्ट्रक्चरिंग सुरू आहे; असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# अस्पृश्यतेच्या काळोखातील मानवतेचा दिवा- सोनबा येवले




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक चळवळीतील अनेक प्रसंग आजही प्रेरणादायी ठरतात. त्यापैकी एक घटना पनवेल नाका, रायगड येथील आहे.

१९२७ मध्ये महाड सत्याग्रहाच्या पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकर महाडला जात असताना पनवेल नाक्यावर एका हॉटेलमध्ये पाणी पिण्यासाठी थांबले. मात्र, त्या हॉटेलच्या मालकाने बाबासाहेबांना अस्पृश्य असल्याने पाणी देण्यास नकार दिला.

हा प्रसंग पाहून सोनबा येवले नावाच्या सज्जनाने तातडीने माठभर पाणी आणून बाबासाहेबांना देण्याचा प्रयत्न केला. दुर्दैवाने, तोपर्यंत बाबासाहेब पुढील प्रवासासाठी निघून गेले होते.

आंबेडकरी विचार मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे आंदोलन दरम्यान या ठिकाणी आले असता त्यांनी हा प्रसंग सांगितला.

ही पाणपोई आजही त्या ऐतिहासिक घटनेची साक्ष देत उभी आहे. केवळ पाणी पाजणारा माठ नव्हे, तर समतेचा व मानवी हक्कांचा ध्वजधारक म्हणून सोनबा येवले आजही स्मरणात आहेत.

आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा या घटनेच्या स्मरणार्थ सोनबा येवले यांना अभिवादन करून, बाबासाहेबांच्या समतावादी विचारांचा प्रसार करत आहे. ही घटना आजच्या काळातही सामाजिक परिवर्तनासाठी प्रेरणादायी ठरते असे बागडे म्हणाले.

सोनबा येवले यांनी त्या काळातील जातीय विषमतेला छेद देत मानवतेचे दर्शन घडवले. त्यांच्या या कृतीतून समतेचा संदेश प्रकट झाला. आजही पनवेल नाक्यावरील त्या ठिकाणी सोनबा येवले यांच्या स्मरणार्थ पाणपोई उभारण्यात आली आहे. ही पाणपोई केवळ पिण्याच्या पाण्याचे ठिकाण नसून, ती मानवतेचा संदेश देणारे प्रेरणास्थळ आहे. असे बागडे यांनी सांगितले. दरवर्षी बाबासाहेबांचे अनुयायी महाडला जाताना या पाणपोईचू दर्शन घेऊन सोनबा येवले यांना विनम्र अभिवादन करतात. आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा यंदाही या ठिकाणी श्रद्धांजली अर्पण करणार आहे. बाबासाहेबांनी सुरु केलेल्या समतावादी लढ्याचा वारसा जपत सोनबा येवले यांच्या कार्याचा गौरव करुन ,समाज परिवर्तनासाठी त्यांच्या योगदानाची आठवण सतत जागी ठेवण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत .

# ‘जेएनपीए’ला जोडणाऱ्या सहा पदरी महामार्गाला मंजुरी

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

जेएनपीए बंदराला चौक या शहरातून तीन राष्ट्रीय महामार्गांना जोडणाऱ्या सहा पदरी मार्गाला केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी मंजुरी दिली. २९.२१ किमीचा हा मार्ग असून, त्यासाठी साडेचार हजार कोटी रुपयांचा खर्च येईल.

बांधा, वापरा, हस्तांतरित करा या तत्त्वावर हा मार्ग विकसित केला जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या आर्थिकविषयक समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. जेएनपीए बंदरात मालवाहतुकीसाठी कंटेनरची वाढती संख्या तसेच जूनपासून सुरू होणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळा मुळे या भागात राष्ट्रीय महामार्ग वाढविण्याची गरज होती.

सध्या पळस्पे फाटा, डी पॉइंट, कळंबोली जंक्शन तसेच पनवेल व मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरून अवजड वाहनांना जाण्यासाठी दोन ते तीन तासाचा कालावधी लागतो. नवी मुंबई विमानळावरून जूनपासून उड्डाण सुरू होईल असे जाहीर करण्यात आले आहे. त्यावेळी प्रत्यक्ष संपर्क मार्गाची गरज भासेल. त्यादृष्टीने हा मार्ग महत्त्वाचा आहे.

योजनेचे स्वरूप

या योजनेची सुरुवात जेएनपीए बंदरातून (पगोटे गाव) होईल. मुंबई–पुणे महामार्गावर (एनएच–४८) यामध्ये मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग व मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गाला तो जोडला जाईल.

या योजनेमुळे मुंबई तसेच पुणे परिसरातील उद्योगधंद्यांना बळ मिळेल.

देशात दूध उत्पादनाच्या वाढीला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने दोन योजनांमध्ये सुधारणा केली. त्याअंतर्गत राष्ट्रीय दुग्धविकास कार्यक्रम आणि राष्ट्रीय गोकुळ अभियान या दोन योजनांसाठी सहा हजार १९० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे.

दुग्ध उत्पादन, खरेदी, प्रक्रिया क्षमता, प्रयोगशाळा चाचणी सुविधा आणि इतर पायाभूत सुविधांसाठी हा निधी खर्च केला जाईल.

# सुनीता विलियम्सची घरवापसी

‘पान जागे फूल जागे,
भाव नयनीं जागला
चंद्र आहे साक्षीला!

प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांनी गायलेले, सुधीर फडके यांनी संगीतबद्ध केलेली गाणी आज आठवली. निमित्त ठरले, भारतीय वंशाच्या अमेरिकी अंतराळयात्री सुनीता विलियम्स अखेर २८६ दिवसांनंतर पृथ्वीवर परतल्या. भारतीय वेळेनुसार बुधवारी पहाटे ३.२७ वाजता अमेरिकेतील फ्लोरिडाच्या समुद्रात स्पेसक्राफ्ट उतरले आणि त्यानंतर आता जगभरात सुनीता विलियम्स सुखरूप परतल्याची चर्चा सुरू झाली आहे. अंतराळात या नऊ महिन्यांच्या प्रवासात सुनीता विलियम्स या काय करत होत्या. कशा राहिल्या असतील, याबद्दल प्रत्येक भारतीयांच्या मनात एक उत्कंठा आहेच. पण, चंद्रावर पाय ठेवणाऱ्या अंतराळवीरानंतर, संशोधन करण्यासाठी गेलेल्या सुनीता विलियम्स यांची टीम काय करत आहे, याची चर्चा पृथ्वीभोवती फिरणाऱ्या चंद्रासह अन्य ग्रहांनाही असणार, अशी कल्पना केली तर त्यात वावगे ठरणार नाही. हिंदू धर्मग्रंथात या ग्रहांना देवतेचा मान दिलेला असला तरी, वैज्ञानिकदृष्टीने अंतराळात गेलेली सुनीता सुद्धा श्रद्धाळू होती, हे लपून राहिलेले नाही. तिने आपल्यासोबत गणपतीची मूर्ती नेली होती. रामाचे स्मरण ती नेहमी करते, असे तिच्या कुटुंबीयांचे म्हणणे आहे.

सुनीता विलियम्स यांच्या वडिलांचे नाव दीपक पंड्या. गुजरातमधील म हसाणा गावाचे ते रहिवासी.

पंड्या यांनी अहमदाबाद येथून डॉक्टरकीचे शिक्षण घेतल्यानंतर थेट अमेरिका गाठली. येथेच त्यांनी स्लोवेनियाई वंशाच्या महिलेशी लग्न केले. यानंतर या दाम्पत्यांच्या पोटी सुनीता यांचा जन्म झाला. लहानपणी सुनीता यांना प्राण्यांबाबत ओढा होता. याच कारणामुळे आपण जनावरांचे डॉक्टर व्हावे अशी त्यांची इच्छा होती. पशुवैद्यक अभ्यासक्रमासाठी त्यांनी अर्जही केला होता. पण, त्यांना आवडीचे कॉलेज मिळाले नव्हते. यानंतर सन १९८३



मध्ये त्यांनी थेट अमेरिकेतील नौदलात प्रवेश घेतला. १९८७ मध्ये भौतिक विज्ञानाची पदवी घेतली. ही पदवीच सुनीता विलियम्स यांच्या यशाची पहिली पायरी ठरली. नौदलातील प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्या एक पायलट झाल्या आणि अनेक प्रकारची विमाने उडवली. याच दरम्यान त्यांना जॉन्सन स्पेस सेंटरमध्ये जाण्याची संधी मिळाली. या प्रसंगाने सुनीता यांच्या करिअरला वेगळीच कलाटणी मिळाली. या ठिकाणी त्यांची भेट अंतराळ यात्री जॉन यंग यांच्याशी झाली. जॉन यंग चंद्रावर जाणारे नववे व्यक्ती होते. सुनीता खूप प्रभावित झाल्या. यानंतरच त्यांनी एक एस्ट्रोनॉट बनण्याचा निर्णय घेतला.

जॉन यंग यांच्या भेटीनंतर सुनीता विलियम्स यांनी अंतराळ यात्री होण्यासाठी नासात अर्ज केला होता; परंतु त्यांचा अर्ज नाकारला होता. यानंतर सन १९९५ मध्ये त्यांनी फ्लोरिडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीतून इंजिनीअरींगची मास्टर डिग्री घेतली होती. यानंतर पुन्हा नासात अर्ज केला. यावेळी मात्र नासाने त्यांची निवड केली. पण अंतराळात जाण्यासाठी सुनीता विलियम्स यांना बराच काळ वाट पाहावी लागली होती. आठ वर्षांनंतर म्हणजेच २००६ मध्ये त्यांना पहिल्यांदा अंतराळात जाण्याची संधी मिळाली होती.

आता दुसऱ्या मिशनमधून अंतराळवीर सुनीता विलियम्स आणि बुच विल्मोर तब्बल ९ महिन्यांनंतर सुरक्षित पृथ्वीवर परतले आहेत. ५ जून रोजी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर दोघे पोहोचले होते. मात्र त्यानंतर तांत्रिक अडचणींमुळे त्यांना ९ महिने तिथेच राहावे लागले. या कालावधीत तिने अवकाशातून महाकुंभ सोहळा पाहिला. सुनीता विलियम्स यांनी उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभमेळ्याचा फोटो कुटुंबीयांना पाठवला होता. तसेच या मोहिमेदरम्यान त्यांनी ९०० तासांचे संशोधन आणि १५० हून अधिक प्रयोग केले आहेत. भारतातील तिच्या पूर्वजांच्या गावात सर्वचजण देव पाण्यात ठेवून त्यांच्या येण्याची वाट पाहत होते. ती सुखरूप परत यावी म्हणून तिच्या झुलासन या मूळ गावात यज्ञ आणि पूजा आयोजित केली होती. आज अमेरिकेतच नव्हे तर भारतातही उत्साहाचे वातावरण आहे. पंतप्रधान नरेद्र मोदी यांनी सुनीता विलियम्स यांना खास पत्र पाठवून त्यांचे कौतुक केले आहे. अमेरिकेच्या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्यासोबत सुनीता विलियम्स यांच्या स्थितीबद्दल चर्चा केली होती. १.४ अब्ज भारतीय तुमच्या कर्तृत्वाचा अभिमान बाळगतात.

तुमच्या जिद्दीने संपूर्ण जगाला प्रेरणा मिळाली आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी सुनीताला उद्देशून लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे. तसेच, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बायडेन प्रशासनावर टीका करत हे अंतराळवीर संकटात टाकल्याचा आरोप केला. मात्र, व्हाईट हाऊसने शब्द पाळल्यामुळे या यशस्वी मिशनचे श्रेय ट्रम्प यांना दिले आहे.

आता सुनीताची घरवापसी झाली आहे. तिला तिच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी वेळ द्यायला हवा. दीर्घकाळ अंतराळात राहिल्याने सुनीता विलियम्स आणि बुच विल्मोर यांना अनेक आरोग्यविषयक आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. अवकाशामधील गुरुत्वाकर्षणाचा अभाव, हाडांची घनता कमी होणे, स्नायू कमकुवत होणे, तसेच रेडिएशनमुळे दृष्टीवर परिणाम होऊ शकतो. तसेच जास्त काळ अवकाशात राहिल्याने त्यांच्या शरीरावर अनेक बदल देखील दिसून येऊ शकतात. पृथ्वीवर परतल्यानंतर अंतराळवीरांना उभे राहणे आणि चालणे कठीण होऊ शकते. त्याम ुळे, सुनीता आणि त्यांच्या टीमला चांगले आरोग्य लाभो ही प्रार्थना करूया.

# श्वानासाठी काहीही! बंगळुरू मधील ब्रीडरने हाफ वुल्फ-हाफ डॉग ब्रीडसाठी खर्च केले ५० कोटी रुपये

**बंगळुरू (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पाळीव प्राण्यासाठी माणसाचे प्रेम काही निराळेच असते. जगभरात पाळीव प्राण्यांवर प्रेम करणाऱ्यांची मोठी संख्या आहे. या प्राण्यांसाठी वाटेल तितके पैसे खर्च करण्याची तयारी काही लोक ठेवत असतात. बंगळुरूमध्ये एका ब्रीडरने श्वानाची दुमिर्ळ प्रजाती मिळिवण्यासाठी प्रचंड मोठी रक्कम खर्च केली. एस. सतीश असे या श्वानप्रेमीचे नाव आहे. अत्यंत दुमिर्ळ असलेला अर्धा लांडगा आणि अर्धा श्वान यांचे संकर असलेल्या प्रजातीचा श्वान खरेदी करण्यासाठी त्यांनी ४.४ दशलक्ष पौंड (५० कोटी रुपये) खर्च केले आहेत. द सन संकेतस्थळाने यासंबंधी वृत्त दिले आहे.

सदर श्वान हा वुल्फडॉग प्रकारातला पहिलाच श्वान आहे. खराखुरा लांडगा आणि कॉकेशियन शेफर्ड यांच्या संकरातून त्याचा जन्म झाला. या श्वानाचे नाव कॅडाबॉम्स ओकामी असे आहे. फ ेब्रुवारी महिन्यात सतीश यांनी हा श्वान विकत घेतला.

कॉकेशियन शेफर्ड हा शक्तीशाली, आकाराने मोठा आणि केसाळ श्वान आहे. कॉकेशियस पर्वतरांगात त्याचे मूळ असल्याचे मानले जाते. तेथील लोक वन्य प्राण्यांपासून पशुधनाचे रक्षण करण्यासाठी कॉकेशियन शेफर्ड पाळत असतात.

सतीश यांनी सांगितले की, हा श्वान अत्यंत दुर्लभ जातीचा श्वान आहे. जो लांडग्यासारखा दिसतो. मला श्वान पाळण्याचा छंद आहे. त्यामुळे मी या श्वानासाठी ५० कोटी खर्च केले. मला भारतात नव्या नव्या जातीचे कुत्रे आणायचे आहेत. अशाप्रकारच्या वेगळ्या जातीच्या श्वानांना पाहण्यासाठी भारतातील लोक उत्सुक असतात. अनेकजण या श्वानाबरोबर फोटो काढतात.

एस. सतीश यांनी पुढे सांगितले की, सुमारे दशकभरापूर्वी त्यांनी श्वानांचे ब्रिडिंग करणे थांबवले होते. पण सध्या ते लोकांना दुमिर्ळ जातीचे श्वान दाखवून भरपूर पैसे कमवतात. कॅडाबॉम्स ओकाम ीला एखाद्या इव्हेंटला नेण्यासाठी ते ३० मिनिटांचे २५ हजार रुपये आकारतात. याबद्दल ते म्हणाले की, हा श्वान दुमिर्ळ असल्यामुळेच मी त्याला खरेदी केले. एखाद्या चित्रपटाच्या इव्हेंटला नेल्यानंतर अभिनेत्यापेक्षाही अधिक लक्ष ओकामीच वेधतो.

कॅडाबॉम्स ओकामी हा एस. सतीश यांच्या सात एकरच्या फार्महाऊसमध्ये राहतो. इथेच सतीश यांचे इतर श्वानही आहेत. प्रत्येक श्वानाला २० बाय २० फुटांची खोली देण्यात आली आहे. जिथे ते आरामात फिरू आणि आराम करू शकतात. सहा लोक श्वानांची काळजी घेण्याकरिता कामावर ठेवण्यात आले आहेत.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**